# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-१६२ दिनांक - २७/०४/२०२४

## Paytm खाते चालु करण्याचे सांगुन ऑनलाईन फसवणूक झालेली रक्कम १,००,०००/- रुपये परत करण्यात सायबर पोलीस ठाणेस यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील मिरारोड पोलीस ठाणेचे हद्दीतील तक्रारदार **नामे श्री. रिजवान** यांचे Paytm खात्यावरील व्यवहार होत नसल्याने त्यांनी ऑनलाईन कस्टमर केअरचा मोबाईल क्रमांक प्राप्त केला. त्यांनतर सदर मोबाईल क्रमांकावर तक्रारदार यांनी फोन केला असता संशयीत मोबाईलधारकाने तक्रारदार यांचेकडुन Paytm खाते चालु करण्याकरीता त्याचे बँक खात्याची सविस्तर माहिती घेतली. त्यानंतर तक्रारदार यंाचे बँक खात्यातुन १,००,०००/- रु कपात झाल्याचा मॅसेज आल्यावर त्यांची आर्थिक फसवणुक झाल्याचे लक्षात आले. त्याअनुषंगाने **सायबर पोलीस ठाणे आवक अर्ज क्रमांक ५८८-बी/२०२४ दिनांक ०२/०३/२०२४ अन्वये** प्राप्त करण्यात आला आहे.

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. सदरची फसवणूक रक्कम **RBLBank** च्या खात्यात जमा झाल्याची माहिती प्राप्त करण्यात आली. तक्रारदार यांची रक्कम तात्काळ गोठविण्याबाबत तसेच तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत जमा होणेकरीता पत्रव्यवहार करण्यात आलेला आला.सायबर पोलीस ठाणेकडून तात्काळ केलेल्या पत्रव्यवहार व पाठपुराव्यामुळे सदरची **फसवणूक १,००,०००/- रुपये** पुन्हा तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **बँक खात्याचे व्यवहाराचे अडचणीकरीता प्रत्यक्ष बँकेला संपर्क करावा.**
- **ऑनलाईन कस्टमर केअर कडुन प्राप्त होणारे मोबाईल क्रमांकाकडुन फसवणुक होण्याची शक्यता असल्याने त्यांना आपली वैयक्तीक माहीती उघड करू नये**
- **बँक/क्रेडीट कार्ड बँक कोणत्याही प्रकारे ग्राहकांना एसएमएस किंवा फोनवर संपर्क साधून वैयक्तिक गोपनीय माहिती विचारणा करत नाही.**
- **आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करू नये.**
- **अनोळखी लिंक, ॲप्लीकेशन डाऊनलोड करू नये.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/ स्वप्नील वाव्हळ,पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर,मपोअं/१३०८७ अमिना पठाण, मपोअं/१६१०६ सुवर्णा माळी, मपोहवा/१२००७ माधुरी धिंडे, पोअं/राहुल बन, पोअं/ विलास खाटीक,पोअं/कुणाल सावळे, यांनी पार पाडली आहे.

सायबर पोलीस ठाणे व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५

सायबर पोलीस ठाणे ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

----0000----